इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक
शाळांना परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८
२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:-** शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१९० इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेचे नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८१८२१३४१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )
उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव.
मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,
अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री.शिवाजी प्रसारक मंडळ, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे | जिजामाता इंग्लिश मिडीअम स्कूल, जेजुरी | इंग्रजी | १ ली |
| ४ | श्री.भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, लांडेवाडी, आंबेगाव , पुणे | शिवाजीराव आढळराव पाटील प्रायमरी स्कूल, पचर, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ५ | वाकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ पेठ | श्री.वाकेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल, पेठ | इंग्रजी | १ ली |
| ६ | के.मुभकर [illegible] शिक्षण प्रसारक मंडळ, एम आयडी सी [illegible] बारामती, पुणे | संतसावतामाळी प्राथ. विद्या. डोर्लेवाडी, ता.बारामती, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| ७ | विद्या प्रतिष्ठान, विद्यानगरी, भिगवण रोड, ता.बारामती, जि.पुणे | विद्या प्रतिष्ठानचे सोमेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल, सोमेश्वर नगर, बारामती | इंग्रजी | १ ली |
| ८ | सरस्वती शिक्षण संस्था, देवतानगर, जळोची, बारामती, पुणे | सरस्वती विद्या मंदीर, जळोची, बारामती, पुणे | इंग्रजी | १ ली |
| ९ | श्री.गणेश प्रतिष्ठान, मु.पो.मोरगाव, बारामती, पुणे | श्री.गणेश विद्यालय मोरगाव, बारामती, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १० | द हार्बर सोसायटी, शिक्षक नगर, घोरपडी | द हार्बर कम्युनीटी स्कूल, नसरापूर, ता.भोर | इंग्रजी | १ ली |
| ११ | कै.प.विश्वनाथराव भेगडे प्रतिष्ठान, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | श्री.डोळसनाथ विद्यालय, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १२ | राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळ, टाकवे बु. ता.मावळ, जि.पुणे | बाळराजे असवले इंग्लिश मेडिअम स्कूल, टाकवे बु. ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १३ | तळेगाव विद्या विकास प्रतिष्ठान, मनोहरनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | श्री.कृष्णराव भेगडे विद्यालय, मनोहरनगर, तळेगाव दाभाडे, ता.मावळ, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १४ | संकल्प शिक्षण प्रसारक मंडळ, पवनानगर, ता.मावळ, पुणे | संकल्प प्राथ इंग्लिश स्कूल, काले कॉलनी, मावळ, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १५ | एव्हरेस्ट एज्यु. सोसा. एव्हरेस्ट हाउस, भुगाव, मुळशी, पुणे | एव्हरेस्ट लिटील चॅपल स्कूल, भुगाव, मुळशी, पुणे | इंग्रजी | १ ली |
| १६ | सुंदराबाई साठे प्रतिष्ठान, एरंडवणे, कर्वेरोड, पुणे | श्री.विद्याभवन स्कूल, पिरंगुट, ता.मुळशी, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| १७ | लिम्स एज्युकेशन सोसायटी | लिटल जिनीयस इंग्लिश मिडीअम स्कूल, आदर्श नगर हिंजवडी | इंग्रजी | १ ली |
| १८ | अहिल्या प्रतिष्ठान, मु.पो.पळसदेव, ता.इंदापूर, जि.पुणे | श्री.मल्लिकार्जुन इंग्लिश मिडीअम स्कूल, मलठण | इंग्रजी | १ ली |
| १९ | स्व.पी.एस.आय. पद्माकर हरगुडे शिक्षण प्रसारक मंडळ, सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे | जिजामाता इंग्लिश मेडिअम स्कूल, सणसवाडी, ता.शिरूर, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| २० | श्री.गुरूदेव दत्त फाऊंडेशन, अप्पर इंदिरानगर, पुणे-३७ | ब्ल्यु स्काय इंग्लिश मेडिअम स्कूल, न्हावरे, ता.शिरूर, जि पुणे | इंग्रजी | १ ली |
| २१ | जिजाऊ शैक्षणिक द्वारा श्री.सतिश नानाभाऊ भराटे साईराम, कर्वेनगर, पुणे | ज्ञानवर्धिनी विद्या मंदिर, तळेगाव ढमढेरे | इंग्रजी | १ ली |
| २२ | श्री पिरॅमिड एज्यु. सोसा., मु.पो. महाळुंगे, ता.खेड, जि.पुणे | ज्ञानवर्धिनी इंग्लिश मिडीयम स्कूल, म्हाळुंगे, खेड | इंग्रजी | १ ली |
| २३ | खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे | न्यु इंग्लिश स्कूल, चाकण, खेड | इंग्रजी | १ ली |
| २४ | आनंद मंडलिक फाउंडेशन, मु.पो.कुरूळी, ता.खेड, पुणे | आनंद इंग्लिश मिडीअम स्कूल, कुरूळी | इंग्रजी | १ ली |
| २५ | ओम चैतन्य गगनगिरी एज्युकेशन इन्स्टिट्यूट, मु.पो.मरकळ, खेड, पुणे | यु इंग्लिश स्कूल, मु.पो.मरकळ, खेड | इंग्रजी | १ ली |
| २६ | दत्तकला शिक्षण संस्थ, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | दत्तकला इंटरनॅशनल स्कूल, स्वामी चिंचोली, ता.दौंड, जि.पुणे | इंग्रजी | १ ली |
| २७ | श्री.रेणुकादेवी सेवा प्रतिष्ठान, पारगाव, ता.दौंड | सौ.मुक्ताई बापूराव ताकवणे शिशू विद्या. , पारगाव, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |
| २८ | भीमा शैक्षणिक न्यास, मधुकरनगर, पाटस, दौंड, पुणे | सुभाष आण्णा कुल प्राथ इंग्लिश कुल | इंग्रजी | १ ली |
| २९ | वरवंड ग्राम शिक्षण संस्था, वरवंड, ता.दौंड, जि.पुणे | कै.एकनाथ सिताराम दिवेकर इंग्लिश मिडीयम स्कूल, वरवंड, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |
| ३० | भैरवनाथ शिक्षण मंडळ, खुटबाव, ता दौंड, जि.पुणे | सानिया प्रायमरी इंग्लिश मेडिअम स्कूल, पारगाव, ता.दौंड | इंग्रजी | १ ली |

२८८८८/८९ ⓔ

तात्काळ

जा.क्र.शिऊसं/प्राशि-३/नखाप्राशा/पुवि-०९

# कायम विनाअनुदान (इंग्रजी माध्यम)

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : - 2 DEC 2009

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद,पुणे

विषय : २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत . .

संदर्भ : १.शासन पत्र क्रमांक नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि३दि.१८.८.२००९
२.मा.प्र.शिक्षण सहसंचालक (प्राथ.),प्राथमिक शिक्षण संचालनालय,म.रा.पुणे, यांचे पत्र क्र.नप्राशा/२००८-०९/इंग्रजी/मान्यता/ड ५१२(ब)/३७२८ दि.८/१०/२००९.

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यांत येते की, खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी सन २००९ - २००१० या शैक्षणिक वर्षापासून कायम विनाअनुदान तत्वावर नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाच्या विचाराधीन आहे.

| अ. क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | कै. मूधकर राजेनिबांळकर शिक्षण प्रसारक मंडळ, एमआयडी.सी ऑफीसजवळ, बारामती, पुणे | संतसावतामाळी प्राथ. विद्या., डोर्लेवाडी ता. बारामती, जि. पुणे. | पहिली | इंग्रजी |

## कायम विनाअनुदानीत

त्यामूळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमून्यातील स्वयंस्पष्ट शिफारशीसह आपला अहवाल १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणेबाबत कळविण्यांत येत आहे..

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना शाळा परवानगी देणे/ न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करण्यांत येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी..
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक / माध्यमिक शाळांपैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रार आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमून्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विदयार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच आपला अभिप्राय सादर करावा.व त्याआधारेच शाळेची परवानगी दिली जाईल.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडी संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधित संस्था उघडणार नाही. असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यांत आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही. याबाबत देखिल संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टॅम्पपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१३ शासन निर्णय क्रमांक माशानु/२००७/(१००१/२००७) (३) माशि-१,दिनांक १९.१०.२००७ मधील तरतूदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेली सदर शाळा अठरा महिन्याच्या आंत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगीचे आदेश रद्द झाले आहेत.असे गृहीत धरले जाईल.सदर शाळा १८ महिन्याच्या आत संस्था सुरु करणार असल्यास तसा संस्थेचा ठराव सादर करण्यात यावा. सदर शाळा २००९-१० मध्ये सुरु केलेली नसल्यास व भविष्यात शाळा सुरु करावयाची नसल्यास त्याबाबत संस्थेचे लेखी पत्र आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर इंग्रजी माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

१५ संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यांत यावी. (उदा:- नांव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

१६ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.
२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.
३. शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.
४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India ) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.
५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर, २००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

**इस्थळप्रतीवर मा. शि. उ. स. यांची सही असे.**

(कु-हाडे सु. जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१.करिता

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

प्रत : १.मा.सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई-३२.
२.मा. शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

प्रत : अध्यक्ष/सचिव
कै. मूधकर राजेनिबांळकर शिक्षण प्रसारक मंडळ, एमआयडी.सी ऑफीसजवळ, बारामती, पुणे

96236/3C

**कायम विनाअनुदान तत्वावर**
**(माध्यम इंग्रजी)**

**जाक्रप्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा.इंग्रजी/१०-११**
**शिक्षण उपसंचालक,**
**पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.**
**दिनांक :** 10 AUG 2010

**प्रति**

**१. शिक्षणाधिकारी (प्राथमिक),**
**जिल्हा परिषद,पुणे.**

**२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी**
**महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,**

**विषय: सन २००९ - २०१० या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणेबाबत.(माध्यम - इंग्रजी) . . .**

**संदर्भ: १.शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक नप्राश १००८/ प्र.क्र.६७८/प्राशि-३, दिनाक १८ ऑगष्ट २००९**
**२. आपले पत्र क्र.जिप/शिक्षण/प्राथ./खाप्राशा/२७९/२०१० दिनांक १९/६/२०१०**

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून २००९ पासून इ. १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २००९-२०१० या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर खाजगी प्राथमिक शाळेस **कायम विनाअनुदान तत्वावर** भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | कै.मधूकर राजे निबांळकर शिक्षण प्रसारक मंडळ, एम.आय.डी.सी.ऑफीसजवळ, बारामती,पुणे. | संत सावतामाळी प्राथ.विद्या. डोर्लेवाडी,ता.बारामती, जि.पुणे. | १ ली | इंग्रजी | जून २००९ पासून |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास शाळा परवानगी आपोआप रद्द होईल.**

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच ववतीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रदद समजण्यांत येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबधीत संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नूतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिका-यांडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील.अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.१३ जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा..सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

संदर्भ १. शासन पत्र क्रमांक याचिका २००९/प्र.क्र. २४४/प्राशि-४/ दिनांक १९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण /२००९/६४११६/याचिका/१५ क (८) ९३४४, दिनांक २४ सप्टेंबर,२००९

३ शासन निर्णय क्रमांक १९०९/प्र.क्र.४३१/प्राशि-३, दिनांक २०/१०/२००९

---

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) नविन प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर शि. उ. स. यांची
सही आहे

(कु-हाडे सु.जं.)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.करिता.

प्रत माहितीस्तव सविनय सादर.

१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन. मुंबई-३२.

२.मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

३.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

४.अध्यक्ष/सचिव,
कै.मधूकर राजे निबांळकर शिक्षण प्रसारक मंडळ,
एम.आय.डी.सी.ऑफीसजवळ,बारामती.पुणे.

**कायम विना अनुदान तत्वावर ( इंग्रजीमाध्यम )**

पुणे जिल्हा परीषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प./शिक्षण/प्राथ./२/५८.
/खा.प्रा.शा./८०/ दि.१/१०/०
१७/१/२०११

प्रति,
मुख्याध्यापक,/मुख्याध्यापिका,
संत सावतामाळी प्राथ.विद्यालय
डोर्लेवाडी ता. बारामती

विषय :- कायम विना अनुदान तत्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना जादा/नैसर्गिक वाढींचा/वाढींच्या प्राथम /जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत...

संदर्भ :- शासन निर्णय क्रमांक-व्ही.एल.एस.-२००२/ (१०००/०२) प्रा.शि.-३ दिनांक १४ जाने.२००३.

वरील विषयासंबंधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रस्ताव विचारात घेता खाली नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा / नैसर्गिक वाढींचा / वाढींच्या प्रथम/ जादा तुकडया / वर्ग जून २०० पासून सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटींच्या आधीन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नांव | माध्यम | इयत्ता | तुकडीवाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | संत सावतामाळी प्राथ. विद्यालय, डोर्लेवाडी | इंग्रजी | इ. २ री<br>इ. १ ली | - नैसर्गिक<br>- दुसरी तुकडी जादा | } मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या आधीन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापनविषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परीसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास / तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणीअंती एकजरी अट नियमबाह्य निदर्शनास आल्यास तुकडी / वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परीषद,पुणे

प्रत :माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी रवाना.
१. सचिव / अध्यक्ष
मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ
बारामती

**कायम विना अनुदान तत्त्वावर**
(मराठी, हिंदी, उर्दू ,इंग्रजी तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/ ८९ /२०१२
पुणे १ दिनांकः- २३/ ०२ /२०१२

**प्रति,**

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
संत सावतामाळी इंग्लिश मेडीयम स्कूल,
डोर्लेवाडी, हनुमान चौक डोर्लेवाडी ता. बारामती जि. पुणे

**विषयः-** कायम / विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/नैसर्गिक वाढीचा/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :- १.** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.१४ जाने.२००३
**२.** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.२३ सप्टेबर.२००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या जादा/**नैसर्गिक वाढीचा** /वाढीच्या प्रथम/**जादा तुकडया**/वर्ग , सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | संत सावतामाळी इंग्लिश मेडीयम स्कूल डोर्लेवाडी, हनुमान चौक डोर्लेवाडी ता. बारामती जि. पुणे | इंग्रजी | ३ री<br>४ थी<br>२ रीची १ ली | नैसर्गिक वाढ<br>जादा<br>तुकडीवाढ | कायम विना अनुदान तत्वावर मंजूर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडी मुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्य करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**अध्यक्ष-** संत सावतामाळी इंग्लिश मेडीयम स्कूल डोर्लेवाडी, हनुमान चौक डोर्लेवाडी ता. बारामती जि. पुणे

**कायम विना अनुदानित**

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवंतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/७८०/२०१४**
**पुणे १ दिनांकः-२९/०३/२०१४**

**प्रति,**

**अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,**
**मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित,**
**संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय, डोर्लेवाडी,**
**ता.बारामती, जि.पुणे.**

**विषय :-** बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम११,पोट नियम(४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

**मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक **०१ एप्रिल २०१३ पासून दिनांक ३१ मार्च २०१६ पर्यंत** तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता **१ ली ते इयत्ता ५ वी** करिता **मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित, संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय, डोर्लेवाडी, ता.बारामती जि.पुणे.**या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे. :-**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.
३. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.
५. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
७. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)**कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)**कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)**प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)**विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम २४(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि **(आठ)** शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपल्बध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ. **१८०० चौ.फुट**
- एकूण बांधकामाचे क्षेत्र. **:- ७०० चौ.फुट**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- **८०० चौ.फुट**
- वर्ग खोल्यांची संख्या. **:- ०७**
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. **:- ०२**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? **:-**

| | मुले | मुंली |
|---|---|---|
| संडास | ०३ | ०३ |
| मुताऱ्या | ०६ | ०७ |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा **:- आहे.**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. **:- कायम विना अनुदानित असल्यामुळे शालेय पोषण आहार योजना लागू नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता.**:-आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.**:- आहे. (पुस्तकसंख्या-१३७,नियतकालिके / वर्तमानपत्रे :०२)**

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा सोसायटी नोंदणी नियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **प्राथ./का.वि.अ./इं./एस.एस.सी/बी.एम.टी./७३८/२०१३-१४** असा आहे तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No.27250211204** हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

१७. मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

१९. जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**कायमविना अनुदानित तत्त्वावर**
(मराठी,**इंग्रजी**, हिंदी, उर्दू , तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
**यशवतराव चव्हाण भवन**
**शिक्षण विभाग (प्राथमिक)**
**जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/४३४/२०१५**
**पुणे १ दिनांक:- २०/०८/२०१५**

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,**
**कै. मधुकर राजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ**
**संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम)**
**डोर्लेवाडी ता. बारामती जि. पुणे**

**विषय:-** कायम विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा / **नैसर्गिक वाढीचा** /वाढीच्या प्राथम/ जादा तुकडया /वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.
**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. व्हीएलएस.-१००२/(१०००/०२)/प्राशि-३, दि.२३ सप्टेंबर २००३

**उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या नैसर्गिक वाढीचा /जादा तुकडया /वर्ग सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | कै. मधुकर राजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम) डोर्लेवाडी ता. बारामती जि. पुणे | इंग्रजी | इयत्ता ६ वी<br>इयत्ता ७ वी | नैसर्गिक वाढ | कायमविना अनुदानित तत्त्वावर |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडीमुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**
**सचिव/अध्यक्ष :- कै. मधुकर राजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ ता. बारामती जि. पुणे**

जा.क्र. खाप्राशा- २०१८/वर्गवाढ/ड ५१२/4961
प्राथमिक शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
डॉ.ॲनी बेझंट मार्ग, मध्यवर्ती इमारत, पुणे- १
दिनांक : २९.११.२०१८.

3 0 NOV 2018

प्रति,

मा. अप्पर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई -३२

**विषय:- इयत्ता ५ वी व ८ वी च्या वर्गास मान्यता मिळणेबाबत.**

संदर्भ:- १. शासन पत्र क्र. आटीई-२०१५/४४/१५एसएम-५, दि.११ मे.२०१५
२. शासन निर्णय क्र.एसएसएन-२०१५/प्र.क्र.१६/१५ /टिएनटि-२ दिनांक २८ ऑगष्ट २०१५.
३. शासन पत्र क्र.संकिर्ण-२०१७/प्र.क्र.-२/एसएम-५, दि.०७/०२/२०१७.
४. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यिता कायदा २०१२, अंमलबजावणी दिनांक १९ जानेवारी २०१३.

महोदया,

राज्यातील अनुदानित/विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित/स्वयंअर्थ सहाय्यित खाजगी प्राथमिक शाळांना इ.५ वी व इ.८वी चे वर्ग जोडण्याबाबत आटीई अंतर्गत तदतूदीनुसार शासनाने निर्णय क्र. प्राशोधो २०१४/(१८१/२०१४)/ एसएम-५दिनांक २४ मार्च २०१५ अन्वये मुख्यकार्यकारी अधिकारी, आयुक्त मनपा,मुख्याधिकारी व कमांडींग ऑफिसर यांचे शिफारशीने शासनास सादर करण्याचे निर्देश आहेत, तसेच संचालनालयास प्राप्त झालेले प्रस्ताव शासनास सादर करण्याचे शासनाने संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यिता कायदा २०१२ ची दिनांक १९ जानेवारी २०१३ पासून राज्यात अंमलबजाणी करण्यात येत आहे, त्यानुसार सध्या स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर तुकडयांना मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे.

सोबत जोडलेल्या शाळेचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावरुन सदरहू शाळेस स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर वर्गवाढ देण्याबाबतचे आदेश निर्गमित व्हावेत, ही विनंती.

**आपला विश्वासु,**

**(सुनिल चौहान)**
शिक्षण संचालक,(प्राथमिक)
महाराष्ट्र राज्य पुणे-१.

| अ.क्र | संस्थेचे /शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सनराईज इंग्लिश मेडीयम स्कूल, नरसी, ता. नायगांव जि. नांदेड | इंग्रजी | इ. ५ वी | २०१५-१६ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २ | उर्दु प्राथमिक विद्यालय, कळंबोली, ता. पनवेल, जि. रायगड | उर्दु | इ. ८ वी | २०१५-१६ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३ | संचेती प्रायमरी इंग्लिश मेडीयम स्कूल, थेरगांव, पुणे | इंग्रजी | इ. ८ वी | २०१६-१७ | मा. अति. आयुक्त यांची शिफारस आहे. |
| ४ | स्वामी विवेकानंद इंग्लिश मेडीयम स्कूल, कोवाड, ता. चंदगड जि. कोल्हापूर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ५ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव शाळा क्र.१ | मराठी | इ. ८ वी | २०१५-१६ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ६ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव उर्दु शाळा क्र.२ | उर्दु | इ. ८ वी | २०१६-१७ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ७ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, एरजांड शाळा क्र. १५ | मराठी | इ. ८ वी | २०१६-१७ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ८ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, मानकिवली शाळा क्र. ४ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ९ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, शिरगांव शाळा क्र. ५ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १० | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, शिरगांवआपटेवाडी शाळा क्र. ६ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ११ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कात्रप शाळा क्र. ७ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १२ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, मोहपाडा शाळा क्र. ९ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १३ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, हेंद्रेपाडा शाळा क्र. १० | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १४ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, सोनिवली शाळा क्र. १३ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १५ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, वडवली शाळा क्र. १७ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १६ | कुळगांव बदलापूर नगरपरिषद, मांजर्ली शाळा क्र. १८ | मराठी | इ. ५ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| १७ | अजय इंटपनॅशनल स्कूल, शिराळा, जि. सांगली | इंग्रजी | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| १८ | स्व. देवकीबाई बंग इंग्रजी प्राथमिक शाळा, कान्होलीबारा ता. हिंगणा, जि. नागपूर | इंग्रजी | इ. ५ वी | २०१६-१७ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| १९ | स्व. कमलताई दवंडे प्रायमरी शाळा गणेशनगर, नागपूर | इंग्रजी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. अपर आयुक्त यांची शिफारस आहे. |
| २० | वेदांत पब्लिक हायस्कूल, नालासोपारा(पु) ता. वसई जि. पालघर | इंग्रजी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २१ | श्रीम. द्रोपती इंग्लिश स्कुल, आचोले रोड, नालासोपारा(पु) ता. वसई जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २२ | ओम इंग्लिश स्कुल, कासा, ता. डहाणु, जि. पालघर | इंग्रजी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २३ | नेताजी सुभाषचंद्र बोस शिक्षण संस्था इंग्लिश मेडीयम स्कूल, मनोर, ता. पालघर जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २४ | जिजामाता विद्यामंदीर हिंदी प्राथमिक, नालासोपारा(पु) ता. वसई जि. पालघर | हिंदी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २५ | प्रबोधनकार ठाकरे विद्यालय, बोईसर, ता. जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २६ | सेंट मेरीज इंग्लिश स्कुल, पास्थळ नाका बोईसर, ता. जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २७ | श्री. रघुवीर प्राथमिक विद्यालय, यादवनगर, शिगांव रोड, बोईसर(पु) ता.जि. पालघर | हिंदी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २८ | विकासवाडी प्राथमिक शाळा, कोसबाड हिल, ता. डहाणू जि. पालघर | मराठी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| २९ | शांती गोविंद हायसकुल, चंद्रपाडा, नायगांव(पु), ता. वसई जि. पालघर | इंग्रजी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३० | डिवाईन लाईफ स्कूल, नालासोपारा(पु.) ता. वसई, जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३१ | जयदीप विद्यामंदीर हायस्कुल, विरार(पु), ता. वसई जि. पालघर | हिंदी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३२ | श्रीम. यमुना पासी विद्यालय, समतानगर, सातिवली, ता. वसई, जि. पालघर | इंग्रजी | इ. ८ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३३ | श्री. सरस्वती विद्यामंदीर गोखिवरे, ता. वसई, जि. पालघर | मराठी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३४ | एकलव्य परिवर्तन विद्यालय, उसगांव, ता. वसइ्र जि. पालघर | मराठी | इ. ५ वी | २०१८-१९ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३५ | दाई हलिमा उर्दु उच्च प्राथमिक शाळा, शेगांव ता. जि. बुलडाणा | उर्दु | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| ३७ | कै. संत सावता माळी प्राथमिक विद्यालय, डोर्लेवाडी ता. बारामती, जि. पुणे | इंग्रजी | इ. ८ वी | २०१४-१५ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ३८ | आदर्श पुर्व माध्यमिक शाळा, खापडे बगीचा, अमरावती, ता. जि. अमरावती | मराठी | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. आयुक्त यांची शिफारस आहे. |
| ३९ | नगरपालिका शिक्षण मंडळ श्रीरामपूर, शाळा क्र.६ | मराठी | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. मुख्याधिकारी यांची शिफारस आहे. |
| ४० | मातोश्री कमलबाई विसपुते इंग्लिश मिडीयम स्कुल, कुवारबांव ता. जि. रत्नागिरी | इंग्रजी | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची शिफारस आहे. |
| ४१ | तुराबलहक्क बाबा उर्दु प्रा.शा. जाम परवा रोड, परभणी | उर्दु | इ. ८ वी | २०१७-१८ | मा. उप आयुक्त यांची शिफारस आहे. |

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे, तसेच, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी देण्याबाबत ....

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एसएफएस-१०१६/प्र.क्र.६९/एसएम- २**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १७ जून, २०१६

**वाचा -**

१) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक नाहप्र-२००९ /(६६३/०९) / माशि - १, दिनांक २० जून, २०१२.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अमाशा/ स्वयंअर्थ/२०१५-१६/माध्य-क(३०१)/२९८१, दिनांक ५ मे, २०१६

**प्रस्तावना -**

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे तसेच विद्यमान शाळेचा यथास्थिती, उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळेस दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याकरिता तरतुदी करणे, तसेच अशी नवीन शाळा स्थापन करण्यासह, विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणे, त्याकरिता अर्ज मागविणे, व विहित पध्दतीने परवानगी देणे, यासाठी महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) पारित केला असून सदर अधिनियम शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून अंमलात आला आहे. तसेच, सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छूक असणा-या इंग्रजी माध्यमांच्या शाळांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता दिनांक २० जून, २०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये विस्तृत कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे.

स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर खाजगी नवीन शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता नवीन शाळा मान्यता देणे, विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरिता दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. सदर प्रस्तावांची छाननी करुन पात्र प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करुन शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

१. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) अन्वये सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता प्राप्त झालेल्या एकूण ५३०१ प्रस्तावांपैकी

३७४३ शाळांचे प्रस्ताव पात्र ठरतात. त्यानुसार या सोबतच्या विवरणपत्रामध्ये दर्शविलेल्या ३७४३ शाळांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून, नवीन शाळा स्थापन करणे आणि विद्यमान शाळांचा दर्जावाढ करणे याकरीता याद्वारे शासन परवानगी देण्यात येत आहे.

**२. शासन परवानगी/शाळांचा दर्जावाढ करण्याच्या अटी व शर्ती -**

२.१ प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांनी **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आहे**.

२.२ पात्र ठरलेल्या संबधित शाळेच्या व्यवस्थापनाने **अधिनियम, २००९** मधील तरतुदींची पुर्तता करुन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात शाळा सुरु करण्यास खालीलप्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे:-

**अ)** ज्या व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता आहे अशा व्यवस्थापनांनी शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्ह्यांच्या शिक्षणाधिकाऱ्यांकडे अर्ज करावेत.

**ब)** ज्या व्यवस्थापनास सन २०१६-१७ करिता या शासन निर्णयाद्वारे पात्र ठरविण्यात आले आहे. अशा व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहित नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी या शासन निर्णयाच्या दिनांकापासून **अठरा महिन्याच्या** आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआपच **रद्दबातल** ठरेल.

**क) सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास / शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी** (Permission) दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दि. २० जून, २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस **मान्यता** (Recognition) घेणे आवश्यक राहील. शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) /शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C.)** मिळविण्यासाठी शासनास अर्ज करेल. सदर अर्जाची छाननी करुन सदर संबंधित शाळा विहित निकष, अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ संलग्नतेसाठी **ना-हरकत (N.O.C.)** प्रमाणपत्र देईल.

२.३ सोबतच्या विवरणपत्रातील यादीनुसार परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळांना i) शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच, ii) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतूदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील

२.४ सदर आदेश संबधित संस्थांना १५ दिवसात कळविण्याची जबाबदारी संबंधित सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक यांची राहील.

२.५ संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनियम, २००९ मधील तरतुदींची पुर्तता झाली असल्याची

खात्री करावी व त्यानंतरच **प्रथम मान्यता** देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

२.६ संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम**, शाळेचे **ठिकाण** इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआपच रद्द** समजण्यात येईल.

२.७ **यु-डायस डाटा:-** या शासन निर्णयाद्वारे परवानगी देण्यात आलेल्या **नवीन शाळा / दर्जावाढ शाळा** बाबत जिल्हानिहाय U-DISE(Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरताना,"***स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा***" म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी **राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई** यांना **नोडल अधिकारी** म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे, संस्थेने, सर्व संबंधितांच्या माहितीकरीता "**स्वयंअर्थसहाय्यित** तत्वावरील परवानगी प्राप्त नवीन शाळा/ दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा" असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे आवश्यक राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१६०६१७१७१८५०९४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramchandra Ganpat Gunjal

Digitally signed by Ramchandra Ganpat Gunjal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=dc74b0493b4979ad0aa76763f873c23fa3bcb449705b2d4aa14a832b6357e54, cn=Ramchandra Ganpat Gunjal
Date: 2016.06.18 13:45:18 +05'30'

**( रा. ग. गुंजाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. आयुक्त(शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
५. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
६. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
८. सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक)
९. शिक्षण निरीक्षक(पश्चिम/उत्तर/दक्षिण) बृहन्मुंबई
१०. सर्व संबधित प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपरिषद/नगरपालिका
११. निवडनस्ती (एसएम-२).

| अ.क्र | जिल्हा | संस्थेचे नाव व पत्ता | शाळेचे नाव व पत्ता | नवीन शाळा/ दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| ११०७ | पुणे | कै.मधूकररजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळविद्या कॉर्नर हॉफीस,नं.308&31 एमआयडीसी,बारामती,ता.बारामती जि.पुणे 413102 | श्री संत सावतामाळी प्रायमरी स्कूल,इंग्लिश मेडीयम, मु.पो.डोर्लेवाडी,ता.बारामती जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| ११०८ | पुणे | कै.एन जी. बराटे एज्युकेशनल ट्रीस्ट,इंग्रजीनगर,अंकूश पायगुडे कंपनी,कोंढवे धावडे,उत्तमनगर,पुणे | ब्यु बर्ड स्कूल,इंग्रजीनगर,अंकूश पायगुडे कंपनी,कोंढवे धावडे,उत्तमनगर,पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| ११०९ | पुणे | श्री सोमेश्वर शिक्षण प्रसारक मंडळनीरा बारामती रोड, सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे | सोमेश्वर पब्लिक स्कूल सोमेश्वरनगरमु.पो.सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे पिन - ४१२३०६ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११० | पुणे | आनंद मेडीकल फौन्डेशनम.पो.कुरुळी,ता.खेड जि.पुणे.410501 | आनंद इंग्लिश मेडीयम स्कूलमु.पो.कुरुळी ता.खेड जि.पुणे 410501 | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| ११११ | पुणे | यशवंत एज्युकेशन अॅन्ड रिसर्च अॅकॅडमी17,हिंदविजय को.ऑ.हौसिंग सोसायटी, विमालनगर,पुणे 411004 | शारदा इंग्लिश मेडीयम स्कूल,मु.पो.वाघापूर.ता.पुरंदर जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११२ | पुणे | ब्रिलियन्स एजुकेशनल फाऊनडेशन मु.पो. जुन्नर,ता.जुन्नर जि. पुण, ४१०५०२ | हिरा इंग्लिश मेडियम स्कूलगट नबर ३७०, मु. खानापूर, पो.जुन्नर, तालुका जुन्नर,जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११३ | पुणे | संत ज्ञानेश्वर विद्या प्रतिष्ठाण,खरपूडी ता.खेड जि.पुणे. | चौधरी पाटील इंग्लिश मेडीयम स्कूल,खरपुडी ता.खेड जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११४ | पुणे | श्री विघ्नहर टुरिस्टनिवृत्तीनगन,पो.शिरोळी बु ता.जुन्नर जि.पुणे 410511 | स्व प्रा रामकृष्ण मोरे इंग्लिश मेडिअम स्कूलनिवृत्तीनगर पोस्ट - शिरोली बु ता.-जुन्नर जिल्हा पुणे पिन -४१०५११ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११५ | पुणे | इंडिअन सोसायटी फॉर सोशल अक्शनटी-२०, नंदनवन, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे, पिन कोड - ४११०२७ | मेरी मेमोरिअल स्कूलपाटस-कांगाव रोड, पाटस, तालुक- दौंड, झिला-पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११६ | पुणे | श्री स्वामी समर्थ कृपा एज्युकेशन सोसायटीए/4,गिरीराज हॉसिंग कॉम्पेक्स, बालाजीनगर,चिंचवड,पुणे.4110033 | श्री स्वामी समर्थ इंग्लिश मेडीयम स्कूल, गेट नं .468,ग्रामपंचायत मिळकत,नं 2249,शंकरनगर,मेदणकर वाडी, चाकण ता.खेड जि.पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११७ | पुणे | हर्षवर्धन पाटील बहुउदेशिय संस्थाशेटफळगढे तालुका इंदापूर जिल्हा पुणे | श्री नागेश्वर इंग्लिश मेडीयम स्कूल अन्ड ज्युनिअर कॉलेजशेटफळगढे, तालुका इंदापूर जिल्हा पुणे | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११८ | पुणे | शंतनू श्रीकांत शिक्षण संस्था,पुणे,98/1,ढोरेनगर, जुना सांगवी पुणे 27 | दि न्यु डेल इंग्लिश मेडीयम स्कूलघोटवडे,ता.मुळशी जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| १११९ | पुणे | साई विद्या प्रतिष्ठानबालाजीनगर, मेदनकरवाडी, चाकण ता. खेड जि. पुणे ४१०५०१ | होली एंजल्स इंग्लिश मिडीअम स्कूलवडगाव घेनंद रोड, भोसे, चाकण, ता - खेड जि - पुणे. ४१०५०१ | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| ११२० | पुणे | प्रबोधिनी विद्या प्रतिष्ठान दौंड२३ महेश सोसायटी गोपाळवाडी रोड दौंड ता.दौंड जि.पुणे. | लर्न अॅन्ड प्ले सेकंडरी स्कूलमहेश सोसायटी, गोपाळवाडी रोड, दौंड ता.दौंड जि.पुणे. | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |
| ११२१ | पुणे | स्व गुलाबराव गोरे प्रतिष्ठानमु पो चाकण ता खेड जि पुणे ४१०५०१ | भामा इंग्लिश मेडियम हाय स्कूलमु ..पो चाकण ता. खेड जि. पुणे 410501 | दर्जावाढ | राज्य मंडळ | उच्च प्राथमिक ला जोडून माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १० वी) | इंग्रजी |

तात्काळ/महत्वाचे
कालमर्यादा

जा.क.शिउसं/माध्य/३/१२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 19 JUL 2016

प्रति

अध्यक्ष/सचिव,

**कै. मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं. ३०८:३१ एमआयडीसी, बारामती, ता. बारामती, जि. पुणे ४१३१०२**

विषय - सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेसाठी परवानगी देण्याबाबत....

**संदर्भ :- १. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र. १,६ व २४) २०१२.**
**२. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१ दिनांक २०. जुन २०१२.**
**३. शासन निर्णय एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२ शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय मुंबई-३ दि. १७.०६.२०१६.**
**४. मा. शिक्षण संचालनालयाकडील पत्र क्रं. अमाशा/स्वयंअर्थ/२०१६/१६-१७/३०१/४०३६ दि. १/७/२०१६**

वरील विषयी आपणांस कळविण्यात येते की,आपल्या संस्थेने वर्षापासून महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता प्रस्ताव सादर केला होता.त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्रमांक-०३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरिता/विद्यमान शाळेचा दर्जावाढ करणेकरिता खालील अटी व शर्तींवर परवानगी दिलेली आहे.

| शासन यादी अ.क्र. | जिल्हा | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता. | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/दर्जावाढ व मंडळ संलग्नता | मान्यता वर्ग/इयत्ता | मान्यतावर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| ११०७ | पुणे | कै. मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं. ३०८:३१ एमआयडीसी, बारामती, ता. बारामती, जि. पुणे ४१३१०२ | श्री संत सावतामाळी प्रायमरी स्कूल, इंग्लिश मेडीयम मु.पो. डोर्लेवाडी, ता. बारामती, जि. पुणे | इंग्रजी | दर्जावाढ (राज्यमंडळ) | माध्यमिक ( इयत्ता ९ वी ते १० वी) | २०१६-१७ |

**अटी व शर्ती :-**

१. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले **माध्यम** व शाळेचे **ठिकाण** इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.
२. शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे,त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी **आपोआप रद्द** समजण्यात येईल.
३. या अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी **शैक्षणिक वर्ष २०१६-१७** पासून असेल.
४. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गां व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत.
५. परवानगी मिळालेपासून **१८ (अठरा) महिन्यांच्या** आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी आपोआप **रद्दबातल** ठरेल.
६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळा/दर्जावाढ शाळा यांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणा-या आदेशांचे व कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदींचे पालन करणे **बंधनकारक** राहील.
७. शाळा इमारतीच्या दर्शनीभागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं **अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा** असे दर्शविणारा फलक शाळेच्या बाहेर प्रवेशद्वारावर लावणे बंधनकारक राहील.
८. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी प्राप्त शाळांना बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील तरतुदींची पुर्तता करुन व्यवस्थापनाने शाळा मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ०३ परिशिष्ठ ०२ मधील विहित नमुन्यात **एक महिन्याच्या आत** प्रथम मान्यतेचा प्रस्ताव सक्षम अधिका-यांकडे सादर करणे आवश्यक राहील.
१० **सीबीएसई,आयसीएसई,आयबी,आयजीएसई,आणि सीआयई** इत्यादी शिक्षण मंडाळाच्या अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्यासाठी इच्छुक व्यवस्थापनास /शैक्षणिक संस्थेस शासनाने पात्र ठरवून **परवानगी (Permission)** दिलेल्या संस्थांनी शासन निर्णय दिनांक २० जून २०१२ मध्ये विहित केलेल्या सर्वंकष धोरणानुसार **ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C )** मिळविण्यासाठी प्रथमतः शाळेस मान्यता घेणे आवश्यक राहील.शाळांना अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक ) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या **संलग्नता ना-हरकत प्रमाणपत्र (N.O.C. )** मिळविणेसाठी शासनास अर्ज करेल.
११ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना U-DISE (Unified District Information System for Education) मध्ये माहिती भरतांना ***'स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा'*** म्हणून स्वतंत्र प्रवर्गात नोंद करणे आवश्यक राहील.
१२ शासनाचे सद्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक राहील.

**(दिनकर टेमकर)**
**शिक्षण उपसंचालक**
**पुणे विभाग पुणे-१**

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी,
१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे /अहमदनगर /सोलापूर.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा. रा.ग.गुंजाळ, उप सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-३२
२. मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.

परवानगी वर्ष : २०१६-२०१७
माध्यम : इंग्रजी
स्वयंअर्थ सहाय्यित शाळा
(माध्यमिक)
यादी क्रमांक ११०७

607
30/10

जा.क्र.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा.दर्जावाढ/पुवि/२०१७ 10503
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक : 25 OCT 2017

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत नविन शाळा स्थापन करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ साठी शैक्ष वर्ष २०१७-१८ जून-२०१७ पासून इ.९ वी चे इंग्रजी माध्यम वर्गास प्रथम मान्यता देण्याबाबत.
कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१ एमआयडीसी , बारामती ,ता.बारामती ,जि. पुणे ४१३१०२ संचलित श्री. संत सावतामाळी प्रायमरी स्कूल,इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी, ता.बारामती जि.पुणे

संदर्भ :- १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-२०१६/प्र.क्र.६९/एसएम-२, दि.१७.६.२०१६
२) या कार्यालयाचे पत्र क्र.शिउसं माध्य ३-१२/स्वयअशाळा /मान्यता/पुवि/२०१६/२६४-६७, दि.१९.७.२०१६
३) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/प्र.मान्य/३६३६ दिनांक ११.९.२०१७

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३.२ व ३.३ अन्वये कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१ एमआयडीसी , बारामती ,ता.बारामती ,जि. पुणे ४१३१०२ संचलित श्री. संत सावतामाळी प्रायमरी स्कूल,इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी, ता.बारामती जि.पुणे या माध्यमिक शाळेच्या इंग्रजी माध्यम वर्गाला संदर्भीय पत्र क्र. २ नुसार माध्यमिक इ. ९ ते १० वर्गास परवानगी जून २०१६ पासून देण्यात आलेली होती. आता आपल्या संदर्भीय पत्र क्र. ३ चे शिफारशीचे अनुषंगाने **इ.९ वी च्या इंग्रजी माध्यम वर्गासाठी जुन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी जून २०१७ पासून आपली स्पष्ट शिफारस विचारात घेता इंग्रजी माध्यमिक दर्जावाढ साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

१.प्रस्तुत प्रकरणी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ मधील तरतुदींचे उल्लंधन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२.नविन वर्गांना कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

३ माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३(२),४८ तसेच ८३ मधील सर्व तरतुदींचे काटेकोरपणे पालन करावे

४.विहित निकषानुसार शिक्षक कर्मचारी यांची नियुक्ती करावी.

५.संचनिश्चिती व कर्मचारी मान्यता दरवर्षी करुन घेण्यात यावी.

६.शैक्षणिक शुल्क विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आकारण्यात यावी.

७.विहित संख्येच्या मर्यादेत विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत.

८.शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

९.सदरची प्रथम मान्यता ही तात्पुरत्या स्वरुपाची असून पाच वर्षांच्या कालावधीनंतर कायमपणे मान्यता देण्याचा या कार्यालयाकडून विचार करण्यात येईल.मात्र शाळेने,संस्थेने माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ मध्ये घालून दिलेल्या शर्ती पूर्ण करणे चालू ठेवले पाहिजे.

१० संस्थेने शाळा परवानगीसाठी विहित केलेले माध्यम व शाळेचे ठिकाण इत्यादींमध्ये भविष्यात कोणतेही बदल करता येणार नाही.

११.शासनाने ज्या ठिकाणी परवानगी दिलेली आहे. त्या ठिकाणी व्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

१२.अधिनियमातील तरतुदींनुसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून असेल

१३.शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ मध्ये ज्या वर्गास परवानगी दिलेली आहे त्या वर्गा व्यतिरिक्त इतर वर्ग चालू करता येणार नाहीत

१४.परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा याना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे ,कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापन व विनियमन) मुख्य अधिनियम २०१३ मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.

१५ शाळा इमारतीच्या दर्शनीभागांत सर्व जनतेच्या माहिती करिता **स्वंय अर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र इंग्रजी माध्यम नवीन माध्यमिक शाळा / वर्ग असे** दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.

पुणे जिल्हा परिषद पुणे
शिक्षण विभाग (माध्यमिक)
दिनांक 25 OCT 2017
टेबल क्र. ... ५५८
अधिक्षक ...
अधिक्षक ...
शिक्षणाधिकारी (माध्य)

१६ महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या

शाळेचे भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.

१७. महाराष्ट्र स्वंयअथसहय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या नियमांच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांनी

**Dise** मध्ये माहिती भरताना स्वय अर्थसहाय्यित शाळा/वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

१८.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

इतर अटी :

जनहितार्थ याचिका क्रमांक ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४.०४.२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळांमध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत

३. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४.सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India) अंतर्गत विहित केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी.संबंधित अधिकारी यांनी त्याचे काटेकोरपणे पालन करावे..वरील काम जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

**६..बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी शाळा संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेले निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.**

**७. महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियम) अधिनियम २००९ व नियम २०१६ चे पालन करणे बंधनकारक आहे.**

वरील निर्धारीत केलेल्या शर्तीचे व वेळोवेळी निर्धारीत करण्यात येतील अशा शर्तीची पूर्तता करणेच्या अधिन राहून आणि समाधानकारक कामकाजाच्या अधिन राहून शाळेची मान्यता चालू ठेवता येईल परंतु प्रतिसाद न मिळालेस शाळेची मान्यता काढून घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी पुढील तपासणीचे वेळी शाळेची प्रगती विचारात घेऊन मान्यता पुढे चालू ठेवणेबाबत विचार करावा.

(दिनकर टेमकर )
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

१. मुख्याध्यापक श्री. संत सावतामाळी प्रायमरी स्कूल,इंग्लिश मेडीयम मु.पो.डालेवाडी, ता.बारामती जि.पुणे

२. विभागीय सचिव,पुणे विभागीय शिक्षण मंडळ, शिवाजीनगर, पुणे.

३. अध्यक्ष/सचिव, , कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१ एमआयडीसी , बारामती ता.बारामती ,जि. पुणे ४१३१०२

**प्रत : माहितीसाठी सविनय सादर**

१. मा.अवर सचिव (माशि १) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ३२.

२. निवडनस्ती

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.
दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७
संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/नै.वाढ/पुवि/२०१८/ ७९३०
दिनांक : - 3 OCT 2018

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, पुणे

**विषय :-स्वयं अर्थ सहाय्यित इंग्रजी माध्यम नवीन शाळेस**
**इ.१० वी चे वर्गास जून-२०१८ पासून नैसर्गिक वाढीने मान्यता मिळणेबाबत.**
कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१, एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे-४१३१०२ संचलित श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे

संदर्भ :- १) शालेय शिक्षण विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र.एसएफएस-१०१६/प्र.क्र६९/एसएम-२, दि.१७.६.२०१६
२) या कार्यालयाचे पत्र क्रं.शिउसं प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता/पुवि/२०१६/२६४-६७,दि. १९.७.२०१६
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/माध्य-३०२/प्र.मा दर्जावाढ/पुवि/२०१७/७८०३, दिनांक २५.१०.२०१७
४) आपले कार्यालयाचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य//आस्था/५३७४, दिनांक २८.९.२०१८

उपरोक्त विषयाचे संदर्भीय पत्रास अनुसरुन कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१,एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे-४१३१०२ संचलित श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे या इंग्रजी माध्यम स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील माध्यमिक शाळेस महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून नवीन शाळा स्थापन करणेकरिता इ. ९ वी साठी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर प्रथम मान्यता संदर्भ क्र. ३ नुसार मिळालेली आहे.आता संदर्भीय पत्र क्र. ४ मधील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांच्या स्वयंस्पष्ट शिफारशीचे अनुषंगाने नैसर्गिक वाढीने इयत्ता १० वी साठी सन २०१८-२०१९ जून-२०१८ पासून खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३ (२), ४८ तसेच ८३ मधील सर्व तरतूदींचे काटेकोरपणे पालन करावे.
२. विहित संख्येच्या मर्यादेत विदयार्थ्यांना प्रवेश दयावेत.
३. शासनाचे वेळोवेळी दिलेले आदेश ,सूचना यांचे पालन करणे बंधनकारक राहील.
४.शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहित करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
५. शाळेच्या संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.
६. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९, महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ तसेच ज्या मंडळाशी संलग्नित होणार आहे त्या मंडळाने विहित केलेला निकष, शर्ती, अटी यांच्या पूर्ततेसह शाळेस इमारत व भौतिक सुधारणा करणे बंधनकारक राहील.
७. सदरील वर्गास उक्त शासन निर्णय दिनांक २०.११.२०१३ अन्वये विहित करण्यांत आलेल्या अटी व शर्तीची, पट संख्येच्या निकषांची तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील तरतूदीनुसार भौतिक सोयी सुविधांची पूर्तता करीत असल्याची खात्री करण्यांत यावी.

MRaut
(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
मुख्याध्यापक श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे

## शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळाजवळ, पुणे – १.

दुरध्वनी क. ०२०-२६१२२६९६ फॅक्स क. ०२०-२६१२२२१७

संकेत स्थळ : dydepune.com ई-मेल : dydpune@gmil.com

---

जा.क्र. शिऊसं/माध्य-३०२/तात्पुरता सांकेतांक क्र./पुवि/२०१८/10224

दिनांक : - 8 OCT 2018

प्रति,

मा.विभागीय सचिव,

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-५

**विषय :-** नविन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यम माध्यमिक दर्जावाढ शाळेस इ.१० वी वर्गासाठी तात्पुरता सांकेतांक क्रमांक मिळणेबाबत.

कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१, एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे-४१३१०२ संचलित श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे

संदर्भ : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र जा.क्र.जि.प./शिक्षण/माध्य/५४०१/२०१८, दिनांक १.१०.२०१८

वरील संदर्भीय पत्रानुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेली शिफारस विचारात घेता कै.मधुकररावजी निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, विदया कॉर्नर हॉफीस नं.३०८८३१, एमआयडीसी बारामती ता.बारामती जि.पुणे-४१३१०२ संचलित श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे या इंग्रजी माध्यम नविन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित दर्जावाढ माध्यमिक विदयालयास सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील इ.१० वी परिक्षेकरिता तात्पुरता सांकेतांक क्रमांक व मंडळ संलग्नता देणेबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे यांनी केलेल्या शिफारशीस हे कार्यालय सहमत आहे.

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे

प्रत : माहितीसाठी रवाना

१. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

२. मुख्याध्यापक, श्री.संत सावतामाळी प्रायमरी स्कूल इंग्लिश मेडीयम मु.पो.डोर्लेवाडी ता.बारामती जि.पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

Maharashtra State Board Of Secondary & Higher Secondary Education,
Pune Divisional Board, Pune - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 & 25536712 | FAX - 020 / 25536761

E-MAIL sscboardpune@gmail.com | web site – www.sscboardpune.in

321

**महत्वाचे**

क्रमांक : पुविमं/डीपी/संलग्नता/
पुणे - ४११००५
दिनांक :- १६/१०/२०१८

प्रति,

मुख्याध्यापक,
संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम)
बारामती - सोनगांव रस्ता, डोर्लेवाडी - 413102, ता. बारामती, जि. पुणे

विषय :- माध्यमिक शाळेस विभागीय मंडळ संलग्नता व तात्पुरता सांकेतिक क्रमांक देणेबाबत.
(मार्च २०१९ परीक्षेसाठी)

संदर्भ :- १. आपला प्रस्ताव दिनांक ०६/२०१८ दि. १६/१०/२०१८
२. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग यांचे पत्र क्र. शिउसं/माध्य-३०२/ता.सां.क्र./पुवि/२०१८/ ६२८५ दि. ८/१०/१८
३. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे / ~~अहमदनगर / सोलापूर~~ यांचे पत्र क्र. जिप/शिक्षण/माध्य/५४०७/२०१८ दि. ९/१०/२०१८
४. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने व संदर्भानुसार आपल्या माध्यमिक शाळेस मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी खालीलप्रमाणे तात्पुरती पुणे विभागीय मंडळ संलग्नता व सांकेतिक क्रमांक देण्यात येत आहे.

| इ. १० वी | | अध्यपनाचे विषय | |
|---|---|---|---|
| माध्यम :- ~~मराठी~~ इंग्रजी | मंडळ मान्यता सांकेतिक क्रमांक S 11.02.~~070~~ 071 | १. मराठी 2/3 | ७. आरोग्य व शारिरीक शिक्षण |
| | | २. हिंदी 2/3 | ८. स्व-विकास व कला रसास्वाद |
| | | ३. इंग्रजी प्रथम | ९. संरक्षणशास्त्र |
| | | ४. गणित | |
| | | ५. विज्ञान व तंत्रज्ञान | १०. |
| | | ६. सामाजिक शास्त्र | |

आपल्या माध्यमिक शाळेस मार्च व जुलै परीक्षेसाठी खाली नमूद केल्यानुसार परीक्षा केंद्र निर्धारीत करण्यात आले आहे.

| | |
|---|---|
| मार्च परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- 1348 |
| | परीक्षा केंद्राचे नांव :- न्यू इंग्लिश स्कूल, डोर्लेवाडी, ता. बारामती, जि. पुणे. |
| जुलै परीक्षेसाठी | परीक्षा केंद्र क्रमांक :- 1341 |
| | परीक्षा केंद्राचे नांव :- श्री छत्रपती शाहू हायस्कूल, बारामती. |

(कृ.मा.प.)

सदर निर्धारीत करण्यात आलेले परीक्षा केंद्र मार्च २०१९ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी सादर करण्यात येणा-या ऑनलाईन आवेदनपत्रावर विहीत ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे.

विभागीय मंडळाकडे संलग्नतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये खाली नमूद केल्या त्रुटी आहेत.

१. पुढील पाच वर्षे सलग मंडळ मान्यता नूतनीकरण करावी.

२. ------------------------------------------------------------

३. ------------------------------------------------------------

**उपरोक्त त्रुटींची पूर्तता दि. १५ डिसेंबर, २०१८ पूर्वी करावी.** विभागीय मंडळाकडून दिलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक कायम करण्यासाठी राज्य मंडळाचे पत्र क्र. रा.मं./परीक्षा-३/७४८९ दि. ४ सप्टेंबर, २००६ नुसार आपल्या माध्यमिक शाळेला दिलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक वर्ष २०१९-२०२० पासून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पर्यंत प्रत्येक वर्षी त्या शैक्षणिक वर्षात १५ मे पर्यंत विहीत नमुन्यात शुल्कासह प्रस्ताव सादर करून मंडळ मान्यता नूतनीकरण करून घेणे आवश्यक आहे.

मंडळ मान्यता नूतनीकरण प्रस्तावात विहीत नमुन्यातील फॉर्म, मंडळ मान्यता पत्राची छायांकीत प्रत व त्या त्या वर्षाकरीता शाळा तपासणी अहवाल (शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी यांचे शिफारशीसह) दि. १५ मे पर्यंत रू. १,०००/- शुल्कासह तद्नंतर दि. ३१ ऑगस्ट पर्यंत रू. १,६००/- (नूतनीकरण शुल्क व दंड) व त्यापुढे प्रत्येक महिन्यात रू. १००/- दंडात्मक शुल्क प्रस्ताव प्रत्यक्ष सादर करेपर्यंत भरावा लागेल.

वरील पध्दतीने व निर्धारीत कालावधीत नूतनीकरण घेतल्याशिवाय आगामी मार्च परीक्षेसाठी परीक्षा आवेदनपत्रे सादर करणे नियमबाहय असेल, याची नोंद घ्यावी. सलग पाच वर्षे मंडळ मान्यता नूतनीकरण करून झाल्यानंतर सन २०१८-२०१९ साठी देण्यात आलेला तात्पुरता सांकेतिक क्रमांक कायम करण्याकरीता शिक्षण उपसंचालक, पुणे यांची शिफारशीसह प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

**विभागीय मंडळाने दिलेली तात्पुरती मंडळ मान्यता खालील अटी / शर्तीचा भंग केल्यास आपोआप रद्द होईल.**

१. पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मंडळ मान्यता नूतनीकरण न करता परीक्षा आवेदनपत्र भरल्यास.

२. परीक्षा कामकाजासाठी केंद्रसंचालक / दालन पर्यवेक्षक / परीक्षक / नियामक / मुख्य नियामक / प्राश्निक इ. मनुष्यबळ पुरविण्यासाठी नकार दिल्यास.

३. परीक्षा संचालनाकरीता माध्यमिक विद्यालयात उपलब्ध असलेल्या भौतिक सुविधा न पुरविल्यास.

४. विभागीय मंडळ सूचना किंवा आदेशाचे पालन न केल्यास

५. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर इ. १० वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थीसंख्येनुसार नोंदणी शुल्क (रजिस्ट्रेशन फी) व शिक्षण संक्रमण फी १० ऑगस्ट पर्यंत मंडळास सादर न केल्यास

६. परीक्षा संचालनामध्ये आपल्या शाळेतील शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांनी गैरमार्ग केल्यास

(स्वाक्षरी) २९/१०/१८

विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे - ५.

**प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.

२. शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, पुणे

३. पुणे विभागीय मंडळातील सर्व शाखा प्रमुख,